RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ७२] शुक्रवार, सप्टेंबर ११, २०१५/भाद्रपद २०, शके १९३७ [पृष्ठ १, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १६०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 11th September 2015.

*NOTIFICATION*

Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013.

No. MIS-11/2014/CR-77(PART-2)/A-2.—In exercise of the powers conferred by the proviso to clause (*e*) of section 3 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) and in supersession of the Government Notification Revenue and Forests Department, No. MIS-11/2014/C.R. 77/A-2, dated the 19th January 2015, the Government of Maharashtra hereby notifies that in relation to acquisition of land in respect of a public purpose, as defined in clasue (*za*) of section 3 of the said Act, in a District for an area not exceeding 10,000 hectors, the Collector of such District shall be deemed to be the appropriate Government, for the purposes of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Deputy Secretary to Government.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

समुचित शासनाने वापरावयाच्या नमुन्यामधील मार्गदर्शक तत्वासंदर्भातील अधिसूचना.

जिल्हाधिकारी, ................ जिल्हा यांचे कार्यालय
....................(येथे कार्यालयाचा पत्ता नमूद करावा)
दिनांक -

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक संकिर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.............*..............., दिनांक ......*....... (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी .......*....... (येथे ज्या प्रयोजनासाठी जमीन संपादित करावयाची आहे त्या प्रयोजनाचा तपशील नमूद करावा) यात यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन संपादन करण्याचा, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, ........*...... जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याचा उद्देश आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये देण्यात आलेल्या, सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण

करण्यासंबंधातील तरतुदी विचारात घेता, समुचित शासनाने सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याचा समुचित शासनाचा हेतू असल्यास ते बाधित क्षेत्रामधील ग्राम स्तरावर किंवा वॉर्डस्तरावरील संबंधित पंचायत, नगरपालिका किंवा यथास्थिति, महानगरपालिका यांच्याशी विचारविनिमय करुन अशा शासनाकडून अधिसूचनेव्दारे विनिर्निष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा दिनांकापासून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अंमलात आणेल अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट कलम (१) मध्ये करण्यात आली आहे ;

त्याअर्थी आता, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेला, .......*........ जिल्हयाचा जिल्हाधिकारी याव्दारे असे अधिसूचित करतो की, बाधित क्षेत्रामध्ये ......*..... (येथे अभ्यास करणा-या अभिकरणाचे नाव विनिर्दिष्ट करावे) यांच्याकडून, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ मध्ये विहित केलेल्या रितीने ......*...... पासून (येथे दिनांक विनिर्दिष्ट करावा) सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्यात येईल.

## अनुसूची

(अधिसूचना काढण्यापूर्वी, येथे संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन व तिच्या चतु:सिमा नमूद करावयात)

जिल्हाधिकारी,

.........*.......... जिल्हा,

* अधिसूचना काढण्यापूर्वी येथे मजकूर भरावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.कि.गावडे)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

# अधिसूचना

जिल्हाधिकारी, .....*..... जिल्हा यांचे कार्यालय,
.............(येथे कार्यालयाचा पत्ता नमूद करावा)
दिनांक -

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक:- ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, .......*......... जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त " सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याव्दारे

असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही:

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा

हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी ......*....... (अधिसूचना काढण्यापूर्वी येथे अधिका-याचे नाव व पत्ता नमूद करावा) यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची- एक

## जमिनीचे वर्णन

गाव ................. तालुका............. जिल्हा..........

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | | |

## अनुसूची- दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | | |
|---|---|---|---|
| अधिसूचना | प्रकल्पाचे नाव | - | * * * |
| निर्गमित | प्रकल्पकार्याचे वर्ण | - | * * * |
| करण्यापूर्वी | समाजाला मिळणारे लाभ | - | * * * |
| *** येथे मजकूर भरावा | (आर्थिक, रोजगार, पायाभूत सूविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) | | |

## <u>अनुसूची- तीन</u>

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

## <u>अनुसूची- चार</u>

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश.

## <u>अनुसूची- पाच</u>

<u>नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील</u>

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता

क. ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील

टिप - उक्त जमिनीच्या आराखडयाचे ........*......... कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल

* अधिसूचना काढण्यापूर्वी येथे मजकूर भरावा.

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी,........*........जिल्हा

# अधिसूचना

जिल्हाधिकारी, ........*......... जिल्हा यांचे कार्यालय,
........*..........(येथे कार्यालयाचा पत्ता नमूद करावा)
दिनांक –

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक : ..................................................... ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या ...................... जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक * * * *. दिनांक ......*......., २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

* अधिसूचना काढण्यापूर्वी भरावयाचा मजकूर

आणि ज्याअर्थी, ............ (जिल्हाच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले आत असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पांडण्यासाठी ......*...... यास (अधिसूचना काढण्यापूर्वी अधिका-यांचे नाव व पत्ता नमूद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची- एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नाव ................., तालुका............., जिल्हा..........

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | | |

## अनुसूची- दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| *** अधिसूचना | प्रकल्पाचे नाव | - * * * |
| काढण्यापूर्वी | प्रकल्पाच्या कामाचे वर्णन | - * * * |
| भरावयाचा | समाजाला होणारे लाभ | - * * * |
| मजकूर | (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभांसंबंधात) | |

## अनुसूची- तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावचे नाव ................. , तालुका............ , जिल्हा...........

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | | |

## अनुसूची- चार

( पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )

टिप : उक्त जमिनीच्या नकाशाचे.................. (कार्यालयाचे नाव व पत्ता) या कार्यालयात निरीक्षण करता होऊ शकेल.

दिनांक :

ठिकाण :

जिल्हाधिकारी,

..................जिल्हा